# हिंदुस्थानच्या इतिहासातील सर्वात मोठे व सर्वाधिक काळ अस्तित्वात असणारे परमार, पवार साम्राज्य!

हिंदुस्थानातील क्षत्रियांचा इतिहास पाहिला तर त्यामध्ये धार पवारांचे स्थान अग्रभागी आहे. हिंदुस्थानातील प्राचीन राजवंश परमार यांचे धार पवार हे वंशज होय. या राजवंश परमारांचा व धार पवारांचा इतिहास अतिशय दैदिप्यमान असून हा पराक्रमी सम्राटांचा इतिहास होय.

### परमारांची उत्पत्ती

ज्या 'परमार' शब्दाचा काळाच्या ओघात अपभ्रंश होवून 'पवार' झाले त्या राजवंश परमार कुळाची मुळात उत्पत्ती कशी झाली हे इतिहासाच्या अनेक ग्रंथांमध्ये, प्राचीन लेखकांच्या दस्तऐवजांमध्ये, अनेक ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये तसेच शिलालेखांमध्ये नमूद आहे. हिंदुस्थानातील क्षत्रियांच्या इतिहासात तर परमार राजवंशाचे स्थान उच्चस्थानी राहिले आहे.

## चार राजपुत वंशांची उत्पत्ती अग्नीकुंडातून

आबु पहाड (माऊंट अबू) येथील अग्नीकुंडातून परमारांसह ४ राजपूत वंशांची उत्पत्ती झाली. हे ४ राजपुत वंश म्हणजे परमार, चौहान, सोलंकी (चालुक्य) व परिहार हे होत. हे अग्नीकुंड अजूनही तेथे पहावयास मिळते. सुमारे ७०० फूट X ७०० फूट आकाराचे हे अग्नीकुंड असून या अग्नीकुंडातून अजूनही ज्योत सुरु असते.

### अधिकृत इतिहास

हिंदुस्थानातील क्षत्रियांचा अतिशय तपशीलवार व विश्वसनीय इतिहास ब्रिटीश इतिहासकार कर्नल जेम्स टॉड यांनी लिहिला. ते ब्रिटीशांच्या सैन्यात कर्नल होते. त्यांची विद्वत्ता व कार्यक्षमता ध्यानी घेवून ब्रिटीशांनी त्यांची जयपूर, जैसलमेर, जोधपूर, मेवाड, कोटा, बुंदी व सिरोही आदी राजपूत राज्यांसाठी पोलिटीकल एजंट म्हणून नियुक्ती केली होती.

### हत्तीवरुन प्रवास

कर्नल जेम्स टॉड यांनी इ.स.१८१२ ते १८१७ या काळात राजस्थान, मध्य भारत, उत्तर भारत आदी विस्तृत क्षेत्राचा परिपूर्ण अभ्यास केला. त्याकाळी वाहने नसल्याने कर्नल जेम्स टॉड हे हत्तीवरुन प्रवास करीत. त्यांच्यासोबत, भाषांतरकार, चित्रकार, विविध मोजमापे घेणारे तज्ञ, अनेक पंथांचे संत, संरक्षणासाठी सैनिक व अन्य लवाजमा असे.

### शिलालेखांची स्केचेस

जेथे प्रत्यक्ष इतिहास घडला त्या सर्व स्थळांना त्यांनी भेटी दिल्या. त्यावेळी कॅमेरे नसल्याने शिलालेखांची स्केचेस तयार करुन घेत. तसेच विविध कागदपत्रे, शिलालेख यांचे भाषांतर करण्यासाठी तज्ञ मंडळी असत. स्थानिक राजे व संस्थानिकां सोबत संवाद साधण्यासाठी दुभाषे असत. समुद्र सपाटीपासून उंची मोजण्यासाठी त्या काळातील बॅरोमीटर सोबत असत.

## वसिष्ठ ऋषींचे आबु पहाड येथे मंदिर!

सर्वात ज्येष्ठ ऋषी वसिष्ठ यांच्या नेतृत्वाखाली आबु पहाड येथे यज्ञ संपन्न झाला. त्या यज्ञकुंडा जवळच गोमुख आहे, त्याच्या पुढे ऋषी वसिष्ठांचे मंदिर आहे. येथे वसिष्ठ ऋषींची उंच मूर्ती असून त्यांचे शिष्य म्हणजे राम, लक्ष्मण,भरत व शतृघ्न यांच्या छोट्या मूर्त्या आहेत. तसेच गुरुपत्नी अरुंधतीची मंदिरात मूर्ती असून मंदिराचे व्दारावर कामधेनू व नंदिनीच्या सुबक मूर्त्या आहेत.

### परिपूर्ण इतिहास

प्रत्येक स्थळाचे अक्षांश रेखांश देखील कॅप्टन जेम्स टॉड यांनी टिपून ठेवले. अशा प्रकारे प्रत्येक ठिकाणाची, ऐतिहासिक स्थळांची व ऐतिहासिक कागदपत्रांची परिपूर्ण माहिती त्यांनी गोळा केली आणि मग हिंदुस्थानच्या क्षत्रियांचा परिपूर्ण इतिहास सिध्द झाला. हा सर्व इतिहास लेखणीबध्द करण्यासाठी त्यांना काही वर्षेखर्च करावी लागली.

### क्षत्रियांचा इतिहास

त्यांनी लिहिलेल्या इतिहासाचा पहिला खंड १८२९ मध्ये "ॲनल्स ॲण्ड ॲन्टीक्वीटीज ऑफ राजस्थान" या नावाने प्रकाशित झाला व दुसरा खंड १८३२ मध्ये प्रकाशित झाला. तसेच त्यांनी 'ट्रॅव्हल्स इन वेस्टर्न इंडिया' हा ग्रंथ लिहिला. मात्र तो प्रकाशित होण्यापूर्वीच दि. १७ नोव्हें. १८३५ मध्ये त्यांचे देहावसान झाले. त्यांच्या मृत्यूनंतर ४ वर्षांनी सन १८३९ मध्ये त्यांचा हा ग्रंथ प्रकाशित झाला.

### राम, कृष्णाचा इतिहास

कर्नल जेम्स टॉड यांनी लिहिलेला हिंदुस्थानातील क्षत्रियांचा इतिहास हा साऱ्या जगात मान्यताप्राप्त मानला जातो. पुराणातील मनु पासून ते प्रभू रामचंद्र व प्रभू श्रीकृष्णा पर्यंतच्या इतिहासाचाही त्यांनी धांडोळा घेतला. या प्राचीन इतिहासानंतर अर्वाचीन इतिहासाची नोंद करताना त्यामध्ये राजवंश परमारांचा इतिहास अधोरेखित झाला.

### वसिष्ठ ऋषींची कामधेनू

अनेक शिलालेख, लोकवांड्मय, ऐतिहासिक ग्रंथ, विविध प्रवाशांनी लिहिलेले लेख यामधून हा सर्व इतिहास उलगडला जातो. सुप्रसिध्द कवी पद्मगुप्त यांचे काव्य ऐतिहासिक दस्ताऐवज म्हणून मानले जाते. त्यामध्ये परमारांची उत्पत्ती कशी झाली याची सविस्तर माहिती आहे. त्यावेळी अर्बुदाचल प्रदेशामध्ये गुरु वशिष्ठांचा आश्रम होता. त्यांच्या पाशी एक कामधेनू होती, विश्वामित्र ऋषींनी ती पळवून नेली.

### यज्ञकुंडातून उत्पत्ती

साहजिकच वशिष्ठ ऋषी विलक्षण संतापले. त्यांनी काही मंत्र म्हणून अग्नीकुंडात आहुती दिली आणि त्या अग्नीकुंडातून एक वीर पुरुष प्रकट झाला. त्याने धनुष्य, किरीट व कांचन कवच धारण केले होते. त्याने पराक्रमाने विश्वामित्रांनी पळवून नेलेली कामधेनू पुन्हा वशिष्ठ ऋषींना आणून दिली. त्यावर वशिष्ठ प्रसन्न झाले व त्यांनी त्या वीर पुरुषाला परमार (शत्रू संहारक) उपाधी दिली व भूतलावर राज्य करण्यासाठी आशीर्वाद दिला, तो हा परमार राजवंश.

### आबु पहाडावर यज्ञ

## धारावर्शने एका बाणात केला ३ राक्षसांचा वध

सर्वात ज्येष्ठ ऋषी वसिष्ठ यांच्या नेतृत्वाखाली आबु पहाड येथे यज्ञ संपन्न झाला. त्या यज्ञकुंडा जवळच गोमुख आहे, त्याच्या पुढे ऋषी वसिष्ठांचे मंदिर आहे. येथे वसिष्ठ ऋषींची उंच मूर्ती असून त्यांचे शिष्य म्हणजे राम, लक्ष्मण,भरत व शतृघ्न यांच्या छोट्या मूर्त्या आहेत. तसेच गुरुपत्नी अरुंधतीची मंदिरात मूर्ती असून मंदिराचे व्दारावर कामधेनू व नंदिनीच्या सुबक मूर्त्या आहेत.

राजपुताना मधील अनेक पारंपारिक लोक कथांमध्ये व ग्रंथांमध्ये या बाबतची अशीच एक कथा नमूद आहे. आबु पहाडावर अनेक ऋषी, मुनी यांनी एकत्र येवून एक मोठा यज्ञ केला. त्यावेळी दैत्यांनी त्यांच्या यज्ञात बाधा आणली. दैत्य होमकुंडात मृत शरीरे, मृत प्राणी, रक्त, हाडे व मांस फेकत. त्यामुळे ऋषी, मुनींना यज्ञ करणे अवघड झाले.

### राजपुतांचे ४ वंश

हे यज्ञकार्य वशिष्ठ ऋषींच्या नेतृत्वाखाली सुरु होते. त्यांनी मंत्र म्हणून यज्ञात आहुती दिली तेव्हा एक पुरुष प्रकट झाला, त्याचे नाव परिहार. त्यानंतर यज्ञातून दुसरा एक पुरुष उत्पन्न झाला त्याचे नाव चालुक्य तथा सोलंकी. तिसरा पुरुष यज्ञातून निर्माण झाला त्याचे नाव परमार व त्यानंतर चौथा पुरुष निर्माण झाला त्याचे नाव चौहान. या सर्वांनी मिळून दैत्यांचा पराभव केला आणि यज्ञ सुरळीत संपन्न झाला, हेच ते यज्ञातून निर्माण झालेले राजपुतांचे ४ वंश.

### इंद्रापासून उत्पत्ती

काही शिलालेख व प्राचीन साहित्यात याबाबत आणखी एक पुराण कथा नमूद आहे. एकदा देवांचा राजा इंद्र याने दुर्वांपासून एक मूर्ती तयार केली व त्यावर अमृत शिंपडून ती अग्नीकुंडात समर्पित केली आणि संजीवन मंत्राचा जप केला. तेव्हा त्या अग्नीकुंडातून एक वीर पुरुष 'मर-मर' (मारो मारो) अशी गर्जना करत प्रकट झाला. त्याचे नाव परमार (शत्रू संहारक) ठेवण्यात आले व त्याला राज्य करण्याचा अधिकार दिला गेला.

### कुलगुरु वसिष्ठ

अशा प्रकारे राजवंश परमारांची उत्पत्ती यज्ञ कुंडातून झाली. या यज्ञाचे यजमान होते वसिष्ठ ऋषी. म्हणून परमारांचे गोत्र "वसिष्ठ" होय. म्हणजेच राजवंश परमारांचे कुलगुरु हे वसिष्ठ ऋषी होत. हा महायज्ञ आबु पहाडावर संपन्न झाला. आबु पहाडाचे हिंदु धर्मात अतिशय उच्च स्थान आहे. रोमन धर्मियांचा जसा 'ऑलिंपस' तसा हिंदू धर्मीयांचा 'आबु पहाड'. आसपासचा प्रदेश 'अर्बुदाचल' या नावाने ओळखला जाई. ब्रिटीशांनी आबु पहाडाचे नामकरण 'माऊंट आबू' असे केले.

## पंचधातूच्या नंदीचे पायावर खोल घाव

आबु पहाड परिसरात पुरातन अचलगड असून तिथे अचलेश्वर महादेवाचे पुरातन शिव मंदिर आहे. या मंदिरा समोर नंदीची भलीमोठी पंचधातूची पुरातन मूर्ती आहे. अहमदाबादचा बादशहा महंमद बेगडा याने खजिन्याच्या लालसेने या नंदीच्या पायावर कुऱ्हाडीचे घाव घातले. पायावरचा हा कुऱ्हाडीचा घाव अजूनही पहावयास मिळतो. त्यावेळी अचानक चहुबाजूने मधमाशांचे थवे आले आणि महंमद बेगडाला सैन्यासह पळ काढावा लागला.

### परमार अग्नीकुलीन

या ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये, शिलालेखांमध्ये, ग्रंथांमध्ये व विविध पुराणांमध्ये राजवंश परमार हा अग्नीकुलीन असल्याची प्रत्येकवेळी नोंद आहे. याबाबत कर्नल जेम्स टॉड यांनी आपल्या इतिहासाच्या ग्रंथात नमूद केले आहे की अन्य ३ राजपुत वंश हे अग्नीकुलीन असतीही परंतु परमार मात्र निश्चितच अग्नीकुलीन होते.

### परमार सुर्यवंशी

अग्नीकुंडातून उत्पत्ती झाल्याने परमार राजवंश ''अग्नीकुलीन'' म्हणून ओळखला जावू लागला. राजवंश परमार हे मुळात सुर्यवंशी होत. क्षत्रियांमध्ये सुर्यवंश, चंद्रवंश व यादव वंश हे पुरातन वंश असून प्रभू श्रीरामचंद्र हे सूर्यवंशी होत. तसेच राजवंश परमार हा देखील सूर्यवंशी असल्याची ऐतिहासिक ग्रंथात तसेच कर्नल जेम्स टॉड यांच्या इतिहासाच्या ग्रंथांमध्ये नोंद आहे.

### समृध्द चंद्रावती नगरी

अग्नीकंडूातन उत्पत्ती झाल्यानंतर वसिष्ठ ऋषी व अन्य सर्व ऋषींनी या चारही वीर पुरुषांना "राजपुत्र" अशी उपाधी दिली व भुतलावर राज्य करण्याचा त्यांना अधिकार व त्यासाठी आशीर्वाद दिले. काळाच्या ओघात 'राजपुत्र'चे 'राजपुत' झाले. सुरुवातीच्या काळात आबु पहाडाच्या चहुबाजूला असणाऱ्या अर्बुदाचल प्रदेशात समृध्द नगरी चंद्रावती ही परमारांची राजधानी होती.

### संपन्न राजधानी

ब्रिटीश इतिहासकार कर्नल जेम्स टॉड यांनी चंद्रावती नगरी परिसराला भेट दिली, पाहणी केली व विस्तृत माहिती घेतली. आता या साऱ्या परिसरात घनदाट जंगल निर्माण झाले आहे. परंतु त्यावेळी हिंदुस्थानातील एक संपन्न नगरी म्हणून ओळखली जात असे. परदेशातून तेथे व्यापार चाले. परमार सम्राटांनी तेथे अनेक उत्तमोत्तम मंदिरे, वाडे व कलात्मक इमारती उभारल्या. अजूनही तेथे चंद्रावती नगरीचे भग्नावशेष अस्तित्वात आहेत. त्यावेळी कॅमेरे नसल्याने काही कलात्मक वास्तू व मंदिरे यांची कर्नल जेम्स टॉड यांनी स्केचेस बनवून घेतले.

## अचलेश्वर मंदिराजवळ तुपाचे मंदाकिनी कुंड

या अचलेश्वर महादेव मंदिराच्या जवळ पुरातन मंदाकिनी कुंड आहे. सुमारे ९०० फूट लांब व २०० फुट रुंद असे हे मंदाकिनी कुंड आहे. त्याकाळी ऋषी, मुनी यज्ञ कार्यासाठी या कुंडात तूप साठवून ठेवीत. ३ राक्षस म्हशीचे रुप घेवून यज्ञकार्यात विघ्न आणीत व तुपाची वाताहात करीत. तेव्हा सम्राट धारावर्शने एका बाणात या तीन राक्षसांचा वध केला त्याचे शिल्प तेथे आहे.

### आबु पहाडावर कुलदेवता

राजवंश परमारांची कुलदेवता आबु पहाडावर म्हणजे आताच्या माऊंट अबूवर विराजमान आहे. सुमारे १७ कि.मी. अंतराचा अजस्त्र घाट रस्ता चढून गेल्यावर माऊंट अबू आहे. माऊंट अबूचे वर आणखी एक टेकडी असून सुमारे ३६० पायऱ्या चढून गेल्यावर एका गुहेमध्ये एक पुरातन देवस्थान आहे ते म्हणजे देवी अर्बुदा. परमारांची ही प्रथम कुलदेवता.

### सर्वात पुरातन देवस्थान

देवी अर्बुदा देवस्थान हे फार पुरातन आहे. हिंदु धर्मातील सर्वात पुरातन ग्रंथ म्हणजे 'स्कंध पुराण'. महर्षी व्यास यांनी लिहिलेल्या या स्कंध पुराणामध्ये फक्त २ देवस्थानांचा उल्लेख आहे - १) कैलास पर्वत व २) देवी अर्बुदा देवस्थान. हे देवस्थान सुमारे ८ हजार वर्षांपूर्वीचे असावे असा अंदाज असून एका गुहेमध्ये देवी अर्बुदा विराजमान आहे. एका सिंहावर दोन बाजूला दोन पाय सोडून देवी आरुढ आहे.

### जाज्वल्य अर्बुदा देवी

देवी अर्बुदा ही 'अधर देवी' म्हणूनही ओळखली जाते. देवी पार्वती कैलासावरुन येत असताना या जागी 'अधर' खाली पडले म्हणून या देवीला अधर देवी असेही म्हटले जाते. त्याचबरोबर सिंहावर आरुढ झाल्याने देवीचे पाय जमिनीला टेकलेले नाहीत म्हणून ती अधर देवी म्हणून ओळखली जाते. साऱ्या भारतातून परमार व पवार वंशीयांची तेथे सदैव रीघ लागलेली असते.

### मूळचे हिदुस्थानी

अशा प्रकारे पौराणिक ग्रंथ, शिलालेख, विविध परदेशी व्यक्तींचे ग्रंथ यामध्ये अग्नीकुंडामधून परमार वंश निर्माण झाल्याचे नमूद असले तरी परमार नेमके कुठून आले याचा मानववंश शास्त्रज्ञांनी शोध घेतला. विविध तर्क वितर्क तपासण्यात आले तेव्हा असे निष्पन्न झाले की परमार हे मूळचे हिंदुस्थानचे रहिवासी होत. शिवाजी महाराजांना देवी तुळजाभवानीने भवानी तलवार दिली तशाच प्रकारे वेदोक्त यज्ञविधी करुन ४ राजपुत वंशांना पृथ्वीवर राज्य करण्यासाठी ऋषी मुनींनी अधिकार प्रदान केले व आशीर्वाद दिले असा याचा सारांश होय असे अभ्यासकांनी नमूद केले आहे.

### अनेक सम्राट निपजले

जरी ४ राजपुत वंशांना राज्य करण्याचे अधिकार देण्यात आले तरी प्रथम राज्य स्थापन केले ते परमारांनी. आबु पहाडाच्या पायथ्यालगत चंद्रावती नगरी राजधानी करुन त्यांनी आबु राज्य स्थापन केले. आस्ते आस्ते त्यांचे साम्राज्य निर्माण झाले. आबु साम्राज्याचे एका मागोमाग एक अनेक दिग्गज व कर्तबगार सम्राट झाले व त्यांनी अतिशय उत्तम प्रकारे राज्यकारभार केला.

### परमार सम्राट

आबु साम्राज्याचे काही सम्राट पुढील प्रमाणे - १) सिंधुराज २) उत्पलराज ३) आरण्यराज ४) कृष्णराज (पहिला) ५) धरणी वराह ६) महिपाल (देवराज) ७) धन्धुक ८) पूर्णपाल ९) कृष्णराज (दुसरा) १०) ध्रुवभट ११) रामदेव १२) विक्रमसिंग १३) यशोधवल १४) धारावर्ष १५) सोमसिंग १६) कृष्णराज (तिसरा) १७) प्रतापसिंह असे अनेक जबरदस्त कर्तबगार सम्राट या परमार कुळात होवून गेले.

### धार नगरी वसविली

अर्बुदाचल मध्ये राज्य स्थापन केल्यानंतर परमार कुळातील वीर पुरुष आजूबाजूच्या प्रदेशात गेले व तेथे त्यांनी विजय संपादन करुन राज्ये स्थापन करण्यास प्रारंभ

# सम्राट विक्रमादित्य व राजा भोज परमार वंशाचे, परमार व धार पवार वंशाचा दैदिप्यमान इतिहास!

केला. अशाच प्रकारे अर्बुदाचल मधील काही परमार कुळ मध्य प्रदेशातील मावळा मध्ये गेले. तेथे विजय मिळवून त्यांनी राज्य स्थापन केले व राज्याची धारा नगरी ही राजधानी वसवली.

### ''सब दुनिया परमारोंकी'' उत्तर भारतातील म्हण

हिंदुस्थानच्या इतिहासात परमारांचे साम्राज्य हे प्रथम साम्राज्य होय. याबाबत इतिहासकार कर्नल जेम्स टॉड यांनी नमूद केले आहे की, भारतीय इतिहासात परमार सम्राटांचा फार मोठा दबदबा होता. आजही उत्तर व पश्चिम भारतात जनतेत म्हण प्रचलित आहे की, ''सब दुनिया परमारोंकी'' यातून भारतीय इतिहासात व जनमानसात परमार वंशाचा मोठा दबदबा असल्याचे अधोरेखित होते.

सम्राट धारावर्ष यांच्या नावावरुन या राजधानीला धार नगरी असे त्यांनी नाव दिले. या धार नगरीच्या शेजारी असलेल्या उंच टेकडीवर देवी अर्बुदा देवी हिचे प्रतिरुप असणाऱ्या देवी धारा देवीची स्थापना करण्यात आली. स्थानिक जनतेत ती कालिका माता म्हणून ओळखली जाते, हे परमारांचे व्दितीय शक्तीपीठ.

### सम्राट विक्रमादित्य

अग्नीकुंडातून निर्माण झालेल्या ४ राजपुत वंशांपैकी परमारांनी सर्व प्रथम विजय मिळवून एका मागोमाग एक राज्ये स्थापन केली. काळाच्या ओघात परमारांचे बलाढ्य साम्राज्य निर्माण झाले. धार राज्य देखील विस्तारत गेले. परमारांच्या धार शाखेतूनच एक बलाढ्य सम्राट उदयाला आले ते म्हणजे सम्राट विक्रमादित्य. माळव्यातील एक प्रसिध्द राजा गंधर्वसेन यांचे सम्राट विक्रममादित्य हे सुपुत्र.

### हिंदुधर्मातील थोर विभुती

राजा गंधर्वसेन यांचे राज्य माळव्या पासून दक्षिण राजस्थान पर्यंत पसरले होते. त्यांना ३ पुत्र. त्यापैकी एक पुत्र शंख अल्पवयात निधन पावला. व्दितीय पुत्र भर्तृहरी सिंहासनाचा त्याग करुन योगी बनले. भर्तृहरी यांनी फार मोठे तप व ध्यानधारणा करुन हिंदु धर्मात उच्च स्थान प्राप्त केले. त्यांनी हिंदु धर्मासाठी अनेक ग्रंथ लिहिले. भर्तृहरी यांनी श्रृंगार शतक, निती शतक व वैराग्य शतक अशा ३ ग्रंथांची रचना केली. हिंदु धर्मातील एक फार मोठे सिध्द पुरुष म्हणून त्यांनी किर्ती संपादन केली.

### मक्केपर्यंत राज्य

राजा भर्तृहरी यांनी सिंहासनाचा त्याग केल्यानंतर विक्रमादित्य राज्याचे अधिपती बनले. सम्राट विक्रमादित्यांनी बलशाली शकांचा पराभव करुन राज्याची सीमा दूरपर्यंत वाढवली. सम्राट विक्रमादित्य हे त्यावेळी जगातील एक शक्तीशाली सम्राट म्हणून ओळखले जात असत. त्यांनी अरबस्थान पर्यंत आपल्या राज्याची सीमा वाढवली. मुस्लिम बांधवांचे पवित्र स्थान काबा येथे सम्राट विक्रमादित्य यांनी शिवलिंगाची स्थापना केली. इस्लाम धर्माचा उदय होण्यापूर्वी काबामध्ये ३६० मूर्ती असल्याचे शाक्त ग्रंथांमध्येही नमूद आहे.

### बलशाली सम्राट

आजही हज यात्रेला जाणारे मुस्लिम बांधव काबा येथे ७ वेळा परिक्रमा करतात आणि केवळ सफेद चादर घेवून जातात. हा सम्राट विक्रमादित्य यांचे काळापासूनचा हिंदू रिवाज आहे. सम्राट विक्रमादित्यांचे प्रभूत्व सारा विश्व मानत होता. त्यांनी उज्जैन नगरीची स्थापन केली. त्यांच्या काळात परमार साम्राज्याची फार मोठी भरभराट झाली.

### दरबारात ९ रत्ने

आजच्या ग्रीनवीच (इंग्लंड) प्रमाणे या राजधानी उज्जैन

### परमारांना वेदोक्त पध्दतीने धर्मकार्य करण्याचा अधिकार

मानववंश तज्ञांचे मते परमार हे मूळचे ब्राह्मण असावेत. परमार यज्ञोपवीत (जानवे) घालीत असत. अजूनही काही पवार बांधव जानवे वापरतात. परमारांना राज्य करण्याचा अधिकार देण्यात आला व त्यांनी राज्य धर्म (क्षत्रिय धर्म) अंगीकारला या कारणाने ते क्षत्रिय म्हणून ओळखले जावू लागले. परमार हे भगवान शंकराचे उपासक होत. त्यांना वेदकाळा पासून वदोक्त पध्दतीने यज्ञ कार्य व धार्मिक विधी करण्याचा अधिकार प्राप्त आहे.

नगरीतून सम्राट विक्रमादित्य यांनी अक्षांश, रेखांश यांची आखणी केली. त्यांच्या दरबारातील प्रख्यात ज्योतिषी व खगोल शास्त्रज्ञ वराह मिहिर यांनी वेदशाळा स्थापन केली होती. सम्राट विक्रमादित्य यांच्या दरबारात ९ रत्ने होती - १) कालिदास (प्रधानमंत्री) २) शंकू ३) वररुची ४) घटस्कर्फर ५) क्षपणक ६) अमरसिंग (अमरकोश निर्माते) ७) वेताल भट्ट ८) वराह मिहिर ९) धन्वंतरी.

### विक्रमादित्य शक

सम्राट विक्रमादित्याने कालगणना करण्यासाठी विक्रमादित्य शक सुरु केला. त्यावेळच्या बलाढ्य शक राजांचा पराभव केल्यानंतर त्या विजया प्रित्यर्थ हा विक्रमादित्य शक सुरु करण्यात आला. हे युध्द इ.स. पूर्व ५७ मध्ये झाले. त्यामुळे सवंत इ.स. पूर्व ५७ पासून विक्रमादित्य शक सुरु होते. सम्राट विक्रमादित्याचे पुत्र शालीवाहन हेदेखील पराक्रमी होते. त्यांनीही शकांचा पराभव करुन सन ७८ मध्ये शालीवाहन शक चालू केले. याच वंशात पुढे प्रसिध्द राजा भोज होवून गेले. त्यांनी आपली राजधानी उज्जैन ऐवजी धारा नगरी राजधानी केली.

### विद्वान सम्राट भोज

राजा भोज हे देखील एक फार मोठे विद्वान सम्राट म्हणून इतिहासात प्रसिध्द आहेत. त्यांच्या काळात उज्जैन मध्ये संस्कृत विद्यालय सुरु होते. कला, साहित्य, शास्त्र निपुण म्हणून राजा भोज प्रसिध्द होते. त्यांनी स्वत: अनेक ग्रंथांची रचना केली. त्यांच्या काळात अनेक वास्तू, किल्ले, तलाव यांचे बांधकाम झाले. एक बहुश्रुत विद्वान व कर्तबगार सम्राट म्हणून इतिहासात ते ओळखले जातात. त्यांच्या काळात गुजरात, कोंकण, महाराष्ट्र, ओरीसा, कर्नाटक पर्यंत राज्य विस्तार झाला.

### विस्ताराने सर्वात मोठे व सर्वाधिक काळ टिकलेले

ब्रिटीश इतिहासकार कर्नल जेम्स टॉड यांनी त्यांच्या ग्रंथामध्ये नमूद केले आहे की, हिंदुस्थानच्या इतिहासात सर्वाधिक भूभाग असलेले व सर्वाधिक काळ अस्तित्वात असलेले साम्राज्य म्हणजे परमार साम्राज्य होय. एकेकाळी हे साम्राज्य अरबस्तानपासून ते कंबोडिया पर्यंत विस्तृत भूभागावर पसरले होते व सुमारे १५०० वर्ष या कुळातील विविध राजांनी व सम्राटांनी राज्य केले.

### धारचे सम्राट

परमारांच्या धार शाखेत २६ राजे झाले - १) कृष्णराज (उपेंद्र) २) वैरीसिंह ३) सीयक ४) वाक्पतीराज ५) वैरीसिंह (दुसरा) ६) सीयक (दुसरा) ७) वाक्पती (दुसरा) मुंज ८) सिंधुराज ९) भोज १०) जयसिंह (प्रथम) ११) उदयादित्य १२) लक्ष्मणदेव १३) नरवर्मदेव १४) यशोवर्मदेव १५) जयवर्मा १६) यशोवर्मा १७) अजयवर्मा १८) विंध्यवर्मा १९) सुभटवर्मा २०) अर्जुनवर्मदेव २१) देवपारदेव २२) जयसिंह (दुसरा) २३) जयवर्मा (दुसरा) २४) जयसिंहदेव (तिसरा) २५) भोजदेव (दुसरा) २६) जयसिंहदेव (चतुर्थ)

### धारचे शेवटचे राजे

धार (माळवा) चे परमार वंशातील जयसिंहदेव (चतुर्थ) हा शेवटचा राजा. यानंतर मुस्लिम शासकांनी वर्चस्व प्रस्थापित केले व परमार साम्राज्याची छोटी छोटी राज्ये बनली. माळव्यातील कोक या नावाच्या एका राजाने इ.स. १४०५ मध्ये ४० हजार घोडेस्वार व १ लाख पायदळ अशी फौज घेवून मुस्लिम राज्यकर्त्यांवर चढाई केल्याची नोंद आहे. हा राजा परमार कुळातीलच होय. धार (माळवा) येथील परमार वंशाच्या राजांनी सुमारे ५०० वर्षेराज्य केले. परमार वंशातील शेवटच्या राजाचे इ.स. १३१५ मध्ये धारचे राज्य अस्तंगत झाले. परमार वंशाच्या नाण्यांवर व ध्वजावर गरुड व सर्पाचे चिन्हे असे.

### राजा जयसिंहचे वंशज

धार येथील शेवटचा राजा जयसिंहदेव (चतुर्थ) यांना पराभव झाल्याने राज्यत्याग करावा लागला. त्यानंतर काहीकाळ परमार राजवंश होता, परमार राजांचे वंशज होते परंतु राज्य नव्हते. काही काळ असाच अंधारात गेला. त्यानंतर शेवटचा परमार राजा जयसिंह याचे वंशज जगनेर (आग्रा नजिक), रणथंबोर व मेवाडमध्ये गेले. त्यापैकी राजा अशोक मेवाडला गेल्यानंतर बीज्जौलीया येथे त्यांना जहागिरी मिळाली.

### शंभूसिंग यांचे राज्य

त्यांचा लहान भाऊ शंभूसिंग हे पराक्रमी होते. छोट्याशा जहागिरीवर ते संतुष्ट नव्हते. ते महाराष्ट्रात आले व त्यांनी स्वपराक्रमाने अहमदनगर व पुणे जिल्ह्यातील काही इलाक्यांवर ताबा मिळवून तेथे आपले राज्य स्थापन केले. परंतु एका शेजारच्या राजाने कपट नीतीचा वापर करुन शंभूसिंगांना धोका दिला व त्यांची हत्या केली. परमार (पवार) वंशातील शंभूसिंग यां च्यामुळेच अहमदनगर व पुणे जिल्ह्यात पवारांची व खानदानी मराठ्यांची अनेक घराणी स्थायिक झालेली आजही पहावयास मिळतात.

### कुलदैवत महादेव (शंकर) कुलस्वामीनी तुळजाभवानी

परमारांचे व आजच्या पवार, धार पवारांचे गोत्र वसिष्ठ असून वंश सूर्यवंश आहे. ते अग्नीकुलीन असून त्यांचे कुलदैवत महादेव म्हणजे शंकर हे होत. प्रथम शक्तीपीठ देवी अर्बुदा माता, व्दितीय शक्तीपीठ देवी धारादेवी तथा कालिका माता, तृतीय शक्तीपीठ तुळजापूरची तुळजाभवानी देवी आहे. पवारांचे लग्नातील देवक धारेची तलवार असून वंशवेल कळंब आहे.

### परमारांचे पवार!

परमार महाराष्ट्रात आल्यानंतर काळाच्या ओघात 'पवार' म्हणून ओळखले जावू लागले. जे मूळचे धार येथून आले ते सारे 'धार पवार' म्हणून ओळखले जावू लागले. काळाच्या ओघात या धार पवारांपैकी अनेक शूरवीरांपैकी केक लढायांमध्ये पराक्रम गाजविले म्हणून त्यांना विविध उपाध्या मिळाल्या व त्यानुसार ते ओळखले जावू लागले.

### शिवरायांचे सेनापती

शंभूसिंग यांची हत्या झाल्यानंतर त्यांचे राज्य खालसा झाले. शंभूसिंग यांचा पुत्र कृष्णाजी हे शिवाजी महाराजांच्या दरबारात आले व शिवरायांचे सेनापती म्हणून कार्य करु लागले. शिवाजी महाराजांनी प्रतापगडावर जेव्हा अफजलखानाचा वध केला तेव्हा अफजलखानाचा पुत्र फाजल खान हा जनान खान्यासह पळून जाण्यात यशस्वी झाला. नेताजी पालकर यांनी दूरपर्यंत त्याचा पाठलाग केला. परंतु तो हाती लागू शकला नाही.

### परमार सम्राटांचा काळ हा भारताचा सुवर्णकाळ

परमार साम्राज्य हे अगोदरच्या काळातील असून त्यानंतर राणा, राठोड व चौहान घराण्यातील राजे राज्यावर आले. चौहानांचा काळ हा सर्वात अलिकडचा, साहजिकच त्यांचा काळ सर्वसामान्यांच्या लक्षात राहिला. चौहानांच्या काळात मोंगल शिरजोर बनले. परमार व पवारांच्या काळात साहित्य, शास्त्र व संस्कृतीचा उत्कर्ष झाला. म्हणूनच परमार सम्राटांचा काळ हा सुवर्णकाळ मानला जातो.

### पन्हाळगडचा इतिहास

त्यानंतर नेताजी पालकर मुलूख काबीज करीत मिरजेच्या भुईकोट किल्ल्याला वेढा घालून बसले तर शिवाजी महाराज वाई प्रतापगड पासून पन्हाळा कोल्हापूर पर्यंतचा मुलूख पादाक्रांत करुन किल्ले पन्हाळगड येथे दाखल झाले. दरम्यान पळून गेलेला फाजल खान आदीलशहाकडून मोठी फौज व कुमक घेवून शिवाजी महाराजांच्या रोखाने वेगाने निघाला.

### कृष्णाजी पवारांचा पराक्रम

त्यावेळी शिवाजी महाराजांचे जवळ पन्हाळा येथे जेमतेम ८ हजार सैन्य होते. त्यापैकी ५ हजार सैन्य त्यांनी कृष्णाजी परमार (पवार) व मोरोपंत पिंगळे यांना देवून फाजल खानशी युध्द करण्यासाठी पाठवले. पंढरपूर नजिक घमासान युध्द झाले. फाजल खान जवळ १५ हजारपेक्षाही जास्त सैन्य होते. परंतु कृष्णाजी पवार व मोरोपंत यांनी पराक्रमाची शर्थ करुन फाजल खानचा फार मोठा पराभव केला.

### सदैव साथ निभावली

कृष्णाजी पवार यांना ३ पुत्र होते. बुआजी, रामजी व कैरोजी. यापैकी रामजी हे कोकणात आले, तेथील लढायांमध्ये त्यांनी विजय प्राप्त केला. शिवाजी महाराजांनी त्यांच्याकडे मंडणगड ते खारेपाटण पर्यंतचा मुलूख व्यवस्थेसाठी सोपविला होता. थोरले बंधू बुआजी व तृतीय बंधू कैरोजी हे शिवाजी महाराजांच्या समवेत असत. या तिन्ही बंधूंनी शिवाजी महाराजांचे नंतर संभाजी महाराजांची साथ निभावली.

### धार व देवासचे राजे

संभाजी महाराजांचे नंतर राजाराम महाराजांच्या सोबत ते राहिले. राजाराम महाराजांना जिंजी पर्यंत मराठा साम्राज्याचा विस्तार केला, याकामी पवार बंधूंनी उल्लेखनीय योगदान दिल्याची इतिहासात नोंद आहे. यामुळे छत्रपती राजाराम महाराजांनी त्यांना 'इनामदार' अशी पदवी दिली व सप्तहजारी सैन्यप्रमुख अशी उच्च उपाधी दिली. बुआजी पवार यांचे २ पुत्र कालोजी व संभाजी हे होत. कोलोजीचे वंशज पुढे देवास राज्याचे राजे झाले तर संभाजीचे वंशज पुढे धार राज्याचे राजे बनले.

### रामजी पवारांचे वंशज

व्दितीय बंधू रामजी यांचे वंशज कोकणात राहिले. पुढे त्यांनी सावरी घोसाळे, ता. मंडणगड, तुरळ, ता. संगमेश्वर व शिरगांव, ता. रत्नागिरी येथे मोकासे म्हणजे गढीवजा वाडे बांधले व तेथून मुलुखाचा कारभार पाहू लागले. तृतीय बंधू कैरोजी यांच्या वंशजांची इतिहासात पुढे नोंद सापडत नाही.

### दैदिप्यमान इतिहास

हिंदुस्थानच्या इतिहासात राजवंश परमारांचे स्थान अढळ आहे. सम्राट विक्रमादित्य व राजा भोज हे याच वंशातील सम्राट होत. अग्नीकुंडातून उत्पन्न झालेल्या ४ राजपुत वंशांपैकी परमार वंशाच्या राजांनी प्रथम राज्य स्थापन केले, वाढविले व कालांतराने त्याचे रुपांतर साम्राज्यात झाले. याच राजवंश परमारांचे धार पवार हे वंशज होत.

### परमार व पवार यांचेकडे शक्ती व बुध्दीचा मिलाप

मानववंश शास्त्रज्ञांच्या मते परमार हे अगडबंब शरीरयष्टीचे नव्हे तर उंच, गोरे व मजबुत शरीरयष्टीचे होते. त्यांच्याकडे शक्ती व बुध्दी यांचा मिलाप होता. त्यामुळे त्यांच्या हातून सुलभ राज्य कारभार झाला व विस्तृत साम्राज्य निर्माण होवून ते प्रदीर्घ काळ टिकले. त्यानंतरही परमार व पवार वंशातील अनेक विद्वान व शूर मंडळींनी अनेक क्षेत्रात कर्तबगारी गाजवली.

### तीन शक्तीपीठे

परमार कालांतराने 'पँवार' म्हणून ओळखले जावू लागले व पुढे त्याचा अपभ्रंश होवून ते 'पवार' झाले. आजही धार पवारांची धार व देवास ही दोन राज्ये असून तेथे वेदशास्त्र संमत पध्दतीने राज्याभिषेक झालेले राजे सिंहासनारुढ आहेत. परमार तथा पवारांचे प्रथम शक्तीपीठ हे आबु पहाड म्हणजे माऊंट अबू वरील अबुदा देवी असून व्दितीय शक्तीपीठ धारची धारा देवी होय तर तृतीय शक्तीपीठ ही तुळजापूरची तुळजाभवानी होय. खुद्द देवी तुळजाभवानी देवीच्या इतिहासाचे ग्रंथात ही सर्व माहिती नमूद आहे.

- उल्हास घोसाळकर (पवार)
रत्नागिरी